३०१

क्रमांक : बिएमआरडीए/एमटीजी/१६.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
१८वा माळा, नवीन प्रशासकीय इमारत,
मादाम कामा रोड, मंत्रालया समोर,
मुंबई - ४०००३२.

दिनांक :- २८ नोव्हेंबर १९७८.

प्राधिकरणाच्या दिनांक २६ सप्टेंबर १९७८ रोजी भरलेल्या सोळाव्या सभेच्या कार्यवृत्तांची प्रत सोबत जोडली आहे.

( कार्यवृत्ताची इंग्रजी प्रत दिनांक १७ ऑक्टोबर १९७८ च्या पत्रान्वये पाठविण्यात आली आहे. )

प्रति :
सर्व सदस्य.

o/c [signature]
कार्यासन अधिकारी.

Issued on 30 NOV 1978

नशंहो २९११

303

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सोळाव्या सभेचे कार्यवृत्त

दिनांक : २८/०९/१९७८

सभास्थान : मुंबई महानगरपालिका सभागृह सभेला उपस्थित असलेल्या सदस्यांच्या व निमंत्रितांच्या नांवांची सूचि सोबत जोडली आहे. (जोडपत्र 'अ')

महापौरांनी प्राधिकरणाच्या अध्यक्षांचे आणि सदस्यांचे स्वागत केले.

सभेच्या प्रारंभी अध्यक्षांचे भाषण झाले. भाषणाची प्रत सोबत जोडली आहे. ( जोडपत्र 'ब')

श्री. व्ही. के. टेंबे यांनी केलेल्या सेवेबद्दल त्यांचा गुणगौरव करणारा व त्यांच्या दुःखद निधनामुळे झालेल्या हानीची नोंद घेणारा ठराव संमत करण्यात आला. (जोडपत्र 'क')

आणखी एक ठराव संमत करुन महानगर आयुक्त या नात्याने श्री. पा. वा. नायक यांनी केलेल्या कामगिरीचा गौरव करण्यात आला (जोडपत्र 'ड') त्यानंतर कार्यसूचीवरील बाबी विचारार्थ हाती घेण्यात आल्या.

<u>बाब क्र १</u> : दि. ३१ मार्च १९७८ रोजी झालेल्या यापूर्वीच्या (पंधराव्या) सभेच्या कार्यवृत्तास पुष्टी देणे. कार्यवृत्तास पुष्टी देण्यात आली.

बाब क्र :२ <u>या पूर्वीच्या (पंधराव्या) सभेच्या कार्यवृत्तावर करण्यात आलेली कार्यवाही</u>. केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. त्यातील बाब क्र. २ मध्ये नव्या मुंबईतील विद्यमान गावठाणांचा विकास आणि विस्तार या करिता करण्यात आलेल्या कार्यवाहीसंबंधीच्या निवेदनावरील आणि नव्या मुंबईच्या विकासकार्यामुळे भूसंपादन बाधित व्यक्तिंच्या पुनर्वसनाच्या संदर्भात त्या विषयावर दि. २८ ऑक्टोबर १९७७ रोजी श्री सोनुभाऊ बसवंत, यांनी विधान परिषद सदस्य, यांनी विधान परिषदेत आणलेल्या ठरावास त्यावेळच्या उद्योग मंत्र्यांना दिलेल्या उत्तराचा प्रत, श्री बसवंत यांच्या इच्छेनुसार सभागृहापुढे ठेवण्यात आली. विधान परिषदेत मंत्री महाशयांना दिलेल्या आश्वासनांना उद्देशून श्री. बसवंत यांनी सर्व गावातील गावठाणांच्या विकासासाठी आणि विस्तारासाठी, भूसंपादनाची झळ पोचलेल्या स्थानिक लोकांच्या पुनर्वसनासाठी व संपादन केलेल्या जमिनिच्या वापरावरील निर्बंध रद्द करण्यासाठी त्वरित कार्यवाही करण्यात यावी असें प्रतिपादन केले. प्रस्तुत समस्येचा विचार करुन नव्या मुंबईतील भूसंपादन बाधित स्थानिक व्यक्तिंच्या गाऱ्हाण्यांचे निराकरण करण्याकरिता आवश्यक असलेल्या उपाययोजनांचा शिफारस प्राधिकरणाला व शासनाला करण्याकरितां सदस्यांची एक समिती नियुक्त करण्यात यावी अशी मागणी कांही सदस्यांनी आणि श्री. बसवंत यांनी केली. नगरविकास विभागाच्या शासन सचिवांनी असे स्पष्टीकरण केले की, जमिन, भूसंपादन अधिनियमान्वये संपादन करावयाची की सन १९७६ च्या नागरी जमीन, (कमाल मर्यादा व विनियमन ) अधिनियमान्वये संपादन करावयाची हे शासनाने ठरविल्यावर भूसंपादन कार्यास गती येईल. भूसंपादन अधिनियमाचे कलम ४ अन्वये प्रसृत केलेल्या अधिसूचिमुळे ''शेतघरांच्या'' बांधकामावर बंधन येत नाही, असे स्पष्टीकरण त्यांनी केले. या बाबींशी संबंध असलेल्या आस्था असलेल्या कांही प्राधिकरण सदस्यांसमवेत आपण या भागास भेट देऊ असे आश्वासन अध्यक्षांनी दिल्यावर प्रस्तुत विषयावरील चर्चा समाप्त झाली. याबाबत तातडीने कार्यवाही करण्याची निकड असल्याचे आपण राज्यशासनास कळवू असेही त्यांनी मान्य केले.

<u>बाब क्र ३:</u> प्रादेशिक योजनेंत फेरबदल <u>दिनांक १५मार्च १९७८ ची</u> आरपीबी ११७८/२८७ -युडी-५या क्रमांकाची सरकारी अधिसूचना.

प्राधिकरणानें कार्यसूचि टिप्पणीवर विचार केला. प्रस्तावाचा सर्व बाजूंनी अभ्यास करण्यासाठी अधिक वेळ लागेल असे सदस्यांना वाटले. म्हणून प्राधिकरणाने खालील ठराव संमत केला. ठराव १४९ प्राधिकरणाला संबंधित प्रस्तावावर आपले अभिप्राय व्यक्त करतां यावे म्हणून १५मार्च १९७८ या तारखेच्या क्र. आरपीबी ११७८/२८७ -युडी-५ च्या सरकारी अधिसूचनेत प्रसिध्द झालेल्या प्रादेशीक योजनेंतील संकल्पित फेरबदलासंबंधी आक्षेप व सूचना स्वीकारण्याची शेवटची तारीख ३१ डिसेंबर १७८ पर्यंत वाढविण्यात यावी अशी

ठराव संमत केला. ठराव १४९ प्राधिकरणाला संबंधित प्रस्तावावर आपले अभिप्राय व्यक्त करता यावे म्हणून १५ मार्च १९७८ या तारखेच्या क्र.आरपीबी ११७८/२८७-युडी-५च्या सरकारी अधिसूचनेत प्रसिध्द झालेल्या प्रादेशिक योजनेतील संकल्पित फेरबदलासंबंधी आक्षेप व सूचना स्वीकारण्याची शेवटची तारीख ३१ डिसेंबर १९७८ पर्यंत वाढविण्यात यावी अशी सूचना शासनास करावी. असा ठराव करण्यात येत आहे.

बाब क्र.४ : वांद्रे कुर्ला समूहासाठी (प्रत्यक्ष कृति क्षेत्र) फेरबदल केलेले नियोजन प्रस्ताव.

प्राधिकरणाने कार्यसूचि टिप्पणीवर विचार केला. पूरप्रतिबंधासाठी भराव घातल्याकारणाने पर्यावरणात होणा-या फेरफारामुळे त्या भागांत होणा-या डासांच्या वाढत्या उपद्रवा बाबत कांही सदस्यांनी चिंता व्यक्त केली. सी.डब्ल्यू पी आर एस खडकवासला या संस्थेच्या जलविषयक अभ्यासाच्या अहवालाच्या आधारे माहीम खाडीत आणि वाकोला नाल्यात भर घालण्याची तरतूद प्रस्तुत प्रकल्पात असून तो पूर्ण झाल्यावर या भागातील पर्यावरणांत फार उल्लेखनीय सुधारणा होईल असे स्पष्टीकरण महानगर आयुक्तांनी केले. त्यांनी असेही प्रतिपादन केले की, भराव टाकण्याचे काम धरून विकास कार्यक्रमाचा समन्वित पध्दतीने विचार करून तो पार पाडण्यासाठी इतरासह महानगर पालिका प्रतिनिधींची समन्वय समिती स्थापन करण्यात आली आहे. भराव घालण्याचे व पुनः प्रापणाचे काम अशा प्रकारे टप्याटप्याने पार पाडण्यांत येईल कीं. काम पार पाडीत असतांना परिस्थितीवर विपरित परिणाम होऊ दिला जाणार नाही. टप्याटप्याने भराव घालण्याचे काम [illegible] धरुन विकासाच्या कामासाठी लागणारा पैसा उभा करण्यासाठी या पूर्वीच भराव घालून तयार केलेली जमीन विकण्यास शासनाची अनुमती मागण्यांत आली असल्याची माहिती त्यांनी प्राधिकरणास दिली.

समितीने त्यानंतर खालील ठराव संमत केला :-

ठराव १५० : दि.९ जून १९७७ चा ठराव क्र.११८चा पुढील भाग म्हणून महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (संक्षेपासाठी ''अधिनियम'') चे कलम २८ चे पोटकलम (३) अन्वये नियोजन समितीने सादर केलेल्या अहवालाचा आणि नियोजन समितीकडे आलेल्या आक्षेपाचा व सूचनांचा विचार करून अधिनियमाचे कलम ४० चे पोटकलम (३) चा खंड (ड) अन्वये प्रदान केलेले अधिकार व याबाबत मिळालेले इतर अधिकार वापरून नगर विकास व आरोग्य विभागाचे दि.७ मार्च १९७७ च्या क्र.बीकेआर ११७७/२६२ -युडी-५ च्या सरकारी अधिसूचनेत निर्दिष्ट केलेल्या वांद्रे-कुर्ला अधिसूचित क्षेत्राच्या कांही भागातील विकासासंबंधीच्या कार्यसूचि टाचणाचे जोडपत्र ४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे फेरबदल केलेल्या व अशा प्रकारे फेरबदल करून मान्यतेसाठी राज्य शासनास सादर केलेल्या नियोजन प्रस्तावास प्राधिकरण मान्यता देत असल्याचा ठराव करण्यांत येत आहे.

पुढे असाही ठराव करण्यांत येत आहे की, पूर्वगामी फेरबदल केलेले नियोजन प्रस्ताव मान्यतेसाठी राज्य शासनास सादर करण्याचे अधिकार याव्दारे महानगर आयुक्तांस देण्यांत येत आहेत.

पुढे असाही ठराव करण्यांत येत आहे कीं, दि.९ जून १९७७चा ठराव क्र.११८ मध्यें अंशतः फेरबदल करुन संबंधित मराठी नोटिस लोकसत्ता दैनिका ऐवजी ''नवशक्तित'' प्रसिध्द करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीस पुष्टी आणि अनुसमर्थन देण्यात येत आहे.

बाब क्र.५ : घाऊक कृषि उत्पादन बाजार आणि लोखंड व पोलाद बाजार आणि कारखाने यांचे नव्या मुंबईत स्थलांतर.

प्राधिकरणाने कार्यसूची टिप्पणीवर विचार केला. सदस्यांनी प्रस्तावाचे स्वागत केले. चर्चेच्या ओघांत खालील मुद्दे उपस्थित करण्यांत आले :-

१) अधिक ट्रक....

(१) अधिक ट्रक स्थानकांची तरतूद करण्यात यावी.

(२) बाजारपेठांच्या स्थलांतरामुळे रिकाम्या झालेल्या जमिनींचा वापर.

(३) घाऊक बाजारपेठांच्या स्थलांतरामुळे दक्षिण मुंबईतील स्थानिक ग्राहकांवर अनिष्ट परिणाम होऊ देता कामा नये.

महानगर आयुक्तांनी या मुद्यांना तपशीलवार उत्तर दिले व खालील-प्रमाणे स्पष्टीकरण केले.

मंत्रीमहाशयांच्या भाषणात जरी सर्वसाधारण मुख्य ट्रक स्थानकाचा उल्लेख असला तरी यापैकी प्रत्येक बाजारपेठेसाठी एक उपस्थानक असेल. शिवाय घाऊक बाजारपेठांच्या दक्षिण मुंबईतून स्थलांतर केल्यास मुंबई बेटावरील रहदारीचा भार बराच हलका होईल.

घाऊक बाजारपेठांच्या स्थलांतरामुळे रिकाम्या झालेल्या जागेच्या पर्यायी वापराबाबत महानगर आयुक्तांनी श्री. बी. एन. आडारकरांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या अभ्यासगटाच्या अहवालाकडे लक्ष वेधले, ज्यांच्या प्रति सभेच्या सुरवातीस सभासदांना वाटण्यात आल्या. महानगर आयुक्तांनी असे स्पष्टीकरण केले की, घाऊक बाजार पेठांच्या स्थलांतरासाठी कायदेशीर तरतुदींची आवश्यकता आहे. कृषि उत्पादन बाजार पेठीच्या स्थलांतरासाठी आवश्यक असलेले अधिकार १९६४च्या कृषि उत्पादन बाजार समिती अधिनियमान्वये शासनास उपलब्ध आहेत. परंतु १९६४ च्या कृषि उत्पादन बाजार समिती अधिनियमाच्या कक्षेत न येणा-या इतर वस्तुसाठी नवीन कायदा आवश्यक आहे.

(३) या मुद्दयाविषयी प्राधिकरण कार्यालयाने केलेल्या पाहणीवरून असे निदर्शनास आले की, संकल्पित स्थलांतराचा मुंबईतील किरकोळ आणि निमघाऊक बाजार व्यापारावर विपरित परिणाम होणार नाही. त्यानंतर प्राधिकरणाने खालील ठराव संमत केला.

ठराव १५१ : असा ठराव करण्यात येत आहे की, कार्यसूचि टिप्पणीत दिलेल्या रूपरेषे-प्रमाणे, मुंबईतून घाऊक कृषि बाजार पेठा आणि घाऊक लोखंड आणि पोलाद बाजार व कारखान्यांच्या स्थलांतराचे व वाशी तुर्भे येथे कृषि उत्पादन बाजार व नव्या मुंबईत पनवेल नजीक कळंबोली क्षेत्रात लोखंड व पोलाद बाजार विकसित करणा-या प्रस्तावास सर्वसाधारणपणे मान्यता देण्यात येत आहे. व निर्दिष्ट हेतु साध्य करण्यासाठी पुढील उपाय-योजना करण्याचे अधिकार आयुक्तास देण्यात येत आहेत.

बाब क्र.६ : मुंबईतील उपहारगृह व्यवसायासाठी चटई क्षेत्र निर्देशांक शिथिल करणे :

कार्यसूचि टिप्पणीचा विचार लांबणीवर टाकण्यात आला.

बाब क्र.७ : १९७७-७८ या वर्षाचे प्राधिकरणाचे हिशेब आणि वित्तीय सल्लागारांचा त्यावरील अहवाल.

प्राधिकरणाने कार्यसूचि टिप्पणीवर विचार केला. १९७७-७८ या वर्षाच्या हिशोबांची व वित्तीय सल्लागारांच्या अहवालाची नोंद घेण्यात आली.

बाब क्र.८ : १९७७ च्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियमांची दुरुस्ती.

ह्या बाबींचा विचार लांबणीवर टाकण्यात आला.

बाब क्र.९ : सन १९७७ च्या मुंबई महानगर प्रदेश विकास (सेवा अटी) विनियमांची दुरुस्ती.

प्राधिकरणाने कार्यसूचि टिप्पणीचा विचार केला आणि खालील ठराव संमत केला :-

ठराव १५२ : असा ठराव करण्यात येत आहे की, जोडपत्र 'ई' मध्ये दर्शविल्याप्रमाणे सन १९७८ च्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (सेवा अटी) (द्वितीय दुरुस्ती) अधिनियमाच्या मसुद्दयास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्र.१०....

बाब क्र.१० : मुंबई महानगर प्रदेशाच्या बृहन्मुंबई बाहेरील क्षेत्रांचा विकास आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची निधि रचना -

प्राधिकरणाने कार्यसूचि टिप्पणीवर विचार विनिमय केला. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्थापनेनंतर बृहन्मुंबई बाहेरील मुंबई महानगर प्रदेशाच्या क्षेत्रांना दिलेल्या सहाय्याबाबतचे टाचण प्राधिकरणाच्या पुढील सभेपुढे ठेवावयाचे ठरले. त्यानंतर प्राधिकरणाने खालील ठराव संमत केला.

ठराव १५३ : असा ठराव करण्यांत येत आहे की, स्थायी समितीने केलेल्या शिफारशीस प्राधिकरण मान्यता देत असून खालील गोष्टी करण्यास राज्य शासनास विनंती करीत आहे.

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियमाचे कलम १८(१)(अ) अन्वये रु ५.०० कोटीहून कमी नाही इतके अंशदान प्रतिवर्ष करावे.

(२) कलम १८ (१) (अ) अन्वये मिळणा-या अंशदानातून नियोजन, समन्वय, संनियंत्रण, सर्वेक्षण व अभ्यास यासंबंधात येणारी जेहमीची तूट भरुन काढण्यास प्राधिकरणास अनुमति द्यावी. आणि

(३) प्राधिकरणास स्थिर भांडवली खर्च करता यावा म्हणून योग्य एक वेळ भांडवली अनुदान करावे.

बाब क्र. ११ : 'मुंबई वाचवा' या शीर्षकाखाली इंडियन एक्सप्रेस (दि.१५-६-७८) या वृत्तपत्राच्या संपादकास लिहिलेल्या पत्रांत उपस्थित केलेल्या मुद्याबाबत मुंबईच्या महापौरांचे पत्र. पत्राची नोंद घेण्यांत आली.

बाब क्र.१२ : वांद्रे-कुर्ला समूह आणि व. बाजाराचे स्थलांतर याबाबत डॉ.पी.जे.देवरस यांनी महाराष्ट्र टाइम्स (दिनांक २१-६-७८) या दैनिकांत लिहिलेल्या लेखांतील मुद्याबाबत मुंबईच्या महापौरांचे पत्र.

पत्राची नोंद घेण्यांत आली.

-----

जोडपत्र 'अ'.....

जोडपत्र 'अ'

दिनांक २८ सप्टेंबर १९७८ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या सभेस उपस्थित असलेल्या सदस्यांची यादी.

| | |
|---|---|
| श्री. हशु अडवाणी, नगर विकास मंत्री . | अध्यक्ष |
| श्री. भाऊराव मुलक, नगर विकास राज्य मंत्री. | उपाध्यक्ष |
| श्री. वामनराव महाडिक, मुंबईचे महापौर . | '' |
| श्री. एल एस. तुल्ला, महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव. | सदस्य |
| श्री. बी. के. चौगुले , महानगर पालिका आयुक्त, मुंबई महानगर पालिका | '' |
| श्री. बी. एन. आडारकर, अध्यक्ष , परिवहन आणि दळणवळण मंडळ, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण . | '' |
| श्री. हंसराज भुग्रा , महानगर पालिका सदस्य, मुंबई महानगरपालिका . | '' |
| श्री. एस. डी. बसवंत , विधान परिषद सदस्य | '' |
| श्री. सी. आर . डिक्रूझ , अध्यक्ष बी. ई. एस. टी. समिती. | '' |
| श्री. एम. एस. देवरा, महानगरपालिका सदस्य, मुंबई महानगरपालिका. | '' |
| श्री. सुधीर जोशी, महानगर पालिका सदस्य, मुंबई महानगरपालिका. | '' |
| श्री. एम. ए. बांडवानी महानगर पालिका सदस्य, मुंबई, महानगरपालिका. | '' |
| श्री. डी. के. बाबविलकर, अध्यक्ष, अलिबाग नगरपालिका, | '' |
| श्री. पी. के. कुरणे , विधान सभा सदस्य, | '' |
| श्री. जी. एम. कोळी , विधान सभा सदस्य, | '' |
| श्री. एम. एन. किनी, महाव्यवस्थापक, मुंबई दूरध्वनी | '' |

---

[illegible]

| | |
|---|---|
| श्री. पुष्पकांत म्हात्रे,<br>महानगर पालिका सदस्य,<br>मुंबई महानगर पालिका. | सदस्य |
| श्री. एन्. जी. के. मूर्ती,<br>अध्यक्ष, नलसंपत्ती आणि<br>व्यवस्थापक मंडळ,<br>मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, | " |
| श्री ए. डब्ल्यू. पाटील,<br>महानगर पालिका सदस्य,<br>मुंबई महानगर पालिका. | " |
| श्री. एस्. डब्ल्यू. पटवारी, अध्यक्ष,<br>डोंबिवली नगरपालिका. | " |
| डॉ. एम. जी. पखळेकर, अध्यक्ष<br>वसई नगरपालिका . | " |
| श्री. व्ही. के. पाटील, अध्यक्ष,<br>पंचायत समिती भिवंडी. | " |
| श्री. बी. एच. शेटे , अध्यक्ष,<br>स्थायी समिती, मुंबई महानगरपालिका. | " |
| श्री. डी. बी. सुळे,<br>विधान परिषद सदस्य, | " |
| श्रीमती ताराबाई वर्तक, अध्यक्ष,<br>जिल्हा परिषद, ठाणे. | " |
| श्री. डी. बी. सुटे, अध्यक्ष,<br>सुधार समिती, मुंबई महानगरपालिका | " |
| श्री. माधव एस. पळनिटकर,<br>महानगर आयुक्त, मुंबई<br>महानगर प्रदेश विकास प्राधिकरण. | सदस्य सचिव. |

निमंत्रित

| | |
|---|---|
| श्री. जी. एच. लालवाणी,<br>सचिव, महाराष्ट्र शासन,<br>नगर विकास विभाग. | " |
| श्री. बी. एस. ढवळे<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको | |

प्राधिकरणाच्या प्रस्तुत सोळाव्या आणि नवीन शासनाने अधिकारग्रहण केल्या वरच्या पहिल्या सभेत आपले स्वागत करतांना मला फार आनंद होत आहे. प्राधिकरणाच्या रचनेत अनेक स्थित्यंतरे झाली असून प्राधिकरणाच्या नवीन सदस्यांचे मी या प्रसंगी स्वागत करीत आहे.

| अनु क्र. | सदस्य | |
|---|---|---|
| १. | श्री. भाऊराव मुळक, नगर विकास राज्य मंत्री. | उपाध्यक्ष |
| २. | श्री. उत्तमराव पाटील, महसूल आणि पुनर्वसन मंत्री. | सदस्य |
| ३. | श्री. एस. बी. चव्हाण, वित्त, नियोजन आणि ऊर्जा मंत्री. | सदस्य |
| ४. | श्री. सुंदरराव सोळंके, उद्योग, दुग्ध व्यवसाय विकास, मत्स्य व्यवसाय आणि पशुसंवर्धन मंत्री | सदस्य |
| ५. | श्री. वी. एस. सुर्वे, गृहनिर्माण मंत्री. | सदस्य |
| ६. | श्री. सदानंद वर्दे, शिक्षण मंत्री. | सदस्य |
| ७. | श्री. बी. एन. पाटील, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास राज्यमंत्री. | सदस्य |
| ८. | श्री. सी. आर. डिकुझ, अध्यक्ष, बीईएसटी. | सदस्य |
| ९. | श्री. सी. सी. गुजवठ, महानगरपालिका सदस्य, मुंबई महानगरपालिका. | सदस्य |
| १०. | श्री. अमरनाथ वामन पाटील, महानगर पालिका सदस्य, मुंबई महानगर पालिका. | सदस्य |
| ११. | श्री. प्रल्हाद कुरणे, विधान सभा सदस्य. | सदस्य |
| १२. | श्री. जी. एम कोळी, विधान सभा सदस्य. | सदस्य |
| १३. | श्री. एल. एस. लुल्ला मुख्य सचिव. | सदस्य |
| १४. | श्री. एम. आर. व्ही. मूर्ती, मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक. | सदस्य |
| १५. | श्री. बी. के. चौगुले, महानगर पालिका आयुक्त. | सदस्य |

प्राधिकरणाचे आता सदस्य असलेल्या खालील व्यक्तींनी केलेल्या कार्याबद्दलची मी या-प्रसंगी कृतज्ञता व्यक्त करीत आहे.

श्री. वसंतदादा पाटील....

| | | |
|---|---|---|
| १) | श्री वसंतदादा पाटील,<br>मुख्य मंत्री. | अध्यक्ष |
| २) | श्री आर.व्ही.त्रिपाठी,<br>नगर विकास, राज्यमंत्री. | उपाध्यक्ष |
| ३) | श्री.वाय.जे.मोहिते,<br>वित्त मंत्री. | |
| ४) | श्री.एस.जी.पवार<br>उद्योग मंत्री. | |
| ५) | श्री.एस.आर.नाईक,<br>गृहनिर्माण मंत्री. | |
| ६) | श्री.पी.एस.पै.अध्यक्ष<br>बीईएसटी समिती. | |
| ७) | श्री.सोहनसिंग कोहली,<br>महानगर पालिका सदस्य,<br>मुंबई महानगर पालिका | |
| ८) | श्री.एस.व्ही.भावे,<br>मुख्य सचिव. | |
| ९) | श्री.पी.आर.पुसाळकर,<br>महाव्यवस्थापक,मध्य रेल्वे, | |
| १०) | श्री. बी.जी.देशमुख,<br>महानगर पालिका आयुक्त,<br>मुंबई महानगर पालिका. | |

विशेषतः श्री.व्ही.के.टैंबे यांच्या दुःखद निधनाकडे आपले मी लक्ष वेधू इच्छितो. श्री.टैंबे हे प्राधिकरणाचे अत्यंत सेवाभावी व मान्यवर सदस्य होते. ब-या अर्थाने ते समाज सेवक म्हणून जगले आणि त्यांनी कार्य केले. प्राधिकरणाचे सदस्य व मुंबईचे नागरिक याप्रसंगी त्यांच्या अकाली निधनाबद्दल दुःख व्यक्त करीत आहोत.

या वर्षी जून महिन्यात महानगर आयुक्त श्री.पी.व्ही.नायक यांची बदली झाली व त्यांचे जागी श्री.माधव श्री.पळनिटकर यांची नियुक्ती झाली. माजी महानगर आयुक्त श्री नायक यांनी प्रारंभीच्या काळांत प्राधिकरणाच्या कार्याची धुरा अत्यंत समर्थपणे वाहिली. त्यांच्या कार्याची याप्रसंगी गौरवपूर्ण शब्दांत नोंद घेणे इष्ट ठरेल.

प्राधिकरणापुढील मुख्य कार्याविषयी म्हणावयाचे झाल्यास, प्राधिकरणाची शेवटची सभा मार्च १९७८ मध्ये झाली. सामान्यतः त्यापुढील सभा जुलैमध्ये व्हावयास हवी होती. पण जुलै किंवा ऑगस्टमध्ये सभा होऊ शकली नाही व त्यांची कारणे सर्वांस माहित आहेत.

बृहन्मुंबई आणि तिच्या परिसराच्या समन्वित विकासासाठी १९७५ मध्ये स्थापन झाल्यापासून प्राधिकरणाने अनेक बाबींचा सखोल अभ्यास चालू ठेवला आहे. परिणामतः या विस्तृत महानगर प्रदेशाच्या मूलभूत समस्यांची ओळख पटली असून या समस्यांवर पर्यायी उपाय बहुशी शास्त्रीय दृष्टीकोणातून शोधण्यांत आले आहेत. अशा प्रकारच्या प्राथमिक माहितीच्या अभावी ९५ लाखाहून अधिक लोकवस्तीच्या व ४००० चौ.किलोमीटर प्रदेशाच्या विकासाचे प्रत्यक्ष कार्य अशक्य आहे.हा प्रश्न अवघड होता आणि आहे.

गुंतागुंतीच्या....

गुंतागुंतीच्या आर्थिक आणि भौगोलिक कारणामुळे व हे क्षेत्र संपूर्ण देशाच्या आर्थिक हालचालीचा केंद्रबिंदू असल्यामुळे हा प्रश्न अधिक अवघड झाला आहे. त्यामुळे या विभागातील रहिवाशांना या प्रदेशांत कोणतेही भरीव कार्य झाल्याचे या काळात दिसून आले नाही. ज्या कार्याचा पाया ३ वर्षापूर्वी घालण्यात आला त्याने आता महत्वाचा टप्पा गाठला आहे. आता आपण मोठ्या आणि प्रचंड योजना हाती घेऊ शकू. या योजनांमुळे या क्षेत्रांतील लोकांचे केवळ राहणीमानच त्वरित सुधारणार नसून त्या योजना या संपूर्ण प्रदेशाचा सुव्यवस्थित आणि विचारपूर्वक विकास साधण्याच्या दिशेने प्रारंभ करण्यास फार उपयुक्त ठरतील. असे केल्यास जीवनाच्या दर्जात सतत सुधारणा साधणे आणि देशाच्या पुढील आर्थिक विकास कार्यात आघाडीचा प्रदेश म्हणून संपूर्ण प्रदेशात सामर्थ्याची सतत भर घालणे ही दोन महान उद्दीष्टे साध्य होतील.

आपणांस माहीत आहेच की, प्रारंभिक नियोजन प्रक्रिये व्यतिरिक्त जागतिक बँकेच्या मदतीने मुंबई महानगर प्रदेशांत पाणी पुरवठा करण्याच्या आणि रस्ते व वाहतुकीच्या व्यवस्थेत सुधारणा करण्याच्या कांही योजना आधीच हाती घेण्यांत आल्या आहेत. या व्यतिरिक्त, सहाव्या योजनेच्या काळात हाती घ्यावयाच्या अनेक योजना असून त्यांचा उल्लेख मी नंतर करणार आहे. आपल्या माहितीसाठीं प्रस्तुत योजनांची संक्षिप्त यादी मी आपल्यापुढे ठेवीत आहे.

(१) दक्षिण व मध्य मुंबईवरील भार हलका करण्याकरिता वांद्रे-कुर्ला क्षेत्राचा पूरक व्यापार केंद्र म्हणून विकास करणे ही पहिली योजना होय.

(२) कल्याण समूहात पाणी पुरवठा, क्षेत्र विकास, व प्रारंभिक सुविधांचा विकास यासारख्या विविध योजना या क्षेत्रांत ठाणे ते अंबरनाथ पर्यंत सहा नगरपालिका व त्यांतील व त्या बाहेरील १00 खेडयांचा समावेश होतो, अंदाजे ८0 कोटी रुपये खर्चाची आणि जागतिक बँकेशी× बँकेशी चर्चा×चालू आहे×आहे व ज्याचे वाटाघाटी चालू असलेली योजना व इतर संलग्न योजना, या योजना पुढील वर्ष-दीड वर्षांत कार्यान्वित होतील. प्रत्येक तपशीलवार योजना प्राधिकरण यथावकाश आपल्याला सादर करील. त्यांच्या अंमलबजावणीत आपला बहुमोल सल्ला फार उपयुक्त ठरेल.

(३) वडाळा येथे ट्रक स्थानक-प्रस्तुत योजने बाबत जागतिक बँकेशी चर्चा चालू आहे. व ठाणे खाडीपासून मुंबई बंदरापर्यंत पसरलेला भूजल वाहतुक प्रकल्प या दोन योजनांमुळे या विभागातील वाहतुक आणि दळणवळण सोयीत सुधारणा होईल.

(४) बेलापूर येथील सीबीडी धरुन नव्या मुंबईत रोजगार स्थलांतर योजनेस गती आणण्याव्यतिरिक्त, केवळ या क्षेत्रांतील नागरिकांस नव्हे तर देशाच्या प्रत्येक सुविचारी नागरिकास असे वाटते की देशाच्या आर्थिक विकासाशी संबंध असलेल्या या प्रदेशाच्या निर्दोष विकासासाठी आणि भरभराटी साठी नावा शेवा येथे पूरक बंदर बांधण्यासाठी तांतडीने कार्यवाही करणें आवश्यक आहे. असें मी म्हणालो तर त्याच्याशी तुम्ही निश्चितच सहमत व्हाल. आपणांस माहीत आहेच की आमच्या विनंतीचा परिणाम म्हणून नियोजन मंडळाने डॉ. अजित मुजुमदार यांच्या अध्यक्षतेखाली या गोष्टीचा त्वरित विचार करण्यासाठीं एक उच्च स्तर समिती नियुक्त केलेली आहे. आपली संघटना केवळ हा प्रकल्प सुरु करण्यासाठी शक्य तेवढे सर्व कांही करीत नसून न्हावा-शेवा बंदर प्रत्यक्षांत उतरल्यावर मिळणा-या फायद्याचा लाभ घेण्यासाठीं पूरक योजना तयार करीत आहे.

(५) जागतिक बँकेकडून मिळणा-या २५ दश लक्ष डॉलर्सच्या अर्थसहाय्याने कार्यान्वित झालेल्या प्रचंड मुंबई नागरी वाहतुक प्रकल्पाचा उल्लेख करण्याची गरज नाही.

(६) आपल्या संघटनेने या भागांतील रेल्वे मार्गांचे जाळे सुधारण्यावर रेल्वे मंडळाचे लक्ष वेधले आहे. विशेषत: दिवा-दासगांव रेल्वे मार्ग आणि खाडीवरील चेंबूर-पनवेल रेल्वे मार्गाचे काम हातीं घेण्यावर आणि मध्य रेल्वेतील रहदारी बाबत अत्यंत अनुकूल परिस्थितीकडे रेल्वे मंडळाचे लक्ष वेधण्यांत आले. आपल्याला रेल्वेकडून अत्यंत अनुकूल प्रतिसाद मिळत आहे.

..२. पुढील दोन....

गोष्ट स्प

२. पुढील दोन-तीन वर्षातील संकल्पित कार्याच्या प्रस्तुत संक्षिप्त वर्णनावरुनही कार्यक्रम×प्रकाश आपल्याला एक गोष्ट स्पष्ट होईल की, यापैकी बहुतांश कार्यात अनेक संस्था सहभागी आहेत आणि म्हणून पायाभूत आणि समन्वय संघटना म्हणून सर्व कार्य एकत्रित करण्यासाठी प्राधिकरणाने योजनेची सुविहित, व्यवहार्य आणि सुसाध्य रुपरेषा तयार केली पाहिजे. गेल्या काही महिन्यात या दिशेने बरेच काम झाले आहे. सहाव्या योजनेची पहिली रुपरेषा राज्य शासनाच्या नियोजन अधिका× अधिका-यांना यथावकाश सादर करण्याकरिता तयार करण्यात येत आहे सहाव्या योजनेवर सर्व संस्थांद्वारा (काही बाबतीत खाजगीक्षेत्राचा समावेश होतो ) १,९०० कोटी रुपयांची गुंतवणूक अभिप्रेत आहे. पुढील काही महिन्यात राज्य शासन प्रस्तुत योजना राष्ट्रीय नियोजन मंडळास सादर करील. आणि मला अशी खात्री आहे की, काही मामुली बदल झाल्यावर प्रस्तुत चौकटीस राष्ट्रीय मान्यता मिळेल आणि त्यानंतर या प्रदेशात सहाव्या योजनेच्या काळात ही चौकट सरकारी आणि खाजगी क्षेत्रातील गुंतवणुकीस मार्गदर्शक ठरेल. मला मान्य आहे की, या प्रश्नांची सध्या केवळ रुपरेषाच तयार आहे. व त्याला आता संबंधित तज्ञ योग्य आकार देत आहेत. लवकरच मी आपल्या विचारार्थ आणि सल्ल्याकरिता योजनेचा मसुदा योग्यस्वरुपात सादर करीन.

३. आपल्या देशातील महाराष्ट्र हे एक जास्तीत जास्त शहरी वस्ती असलेले राज्य आहे. या राज्यातील एक तृतियांशहून अधिक लोक शहरांत राहतात. मुंबई महानगर प्रदेश हा भाग नागरीकरणाचे मूल स्थान आहे. व म्हणून हया प्रदेशाचे प्रश्न गुंतागुंतीचे आणि गंभीर आर्थिक आणि लोकसंख्या शास्त्रीय स्वरुपाचे आहेत. या प्राधिकरणाच्या सदस्यांचा परिपक्व अनुभव विचारात घेता हे कार्य आपल्या आवाक्याबाहेरचे नाही. याची मला खात्री आहे. आपण आता कार्यसूचीकडे वळू.

---

जोडपत्र 'क'......

जोडपत्र - 'क'

ठराव

प्राधिकरणाचे माजी सदस्य श्री. व्ही. के. टेंबे यांचे दि. ३० ऑगस्ट १९७८ रोजी दुःखद निधन झाले. श्री. टेंबे हे प्रारंभापासून प्राधिकरणाचे सदस्य होते, शिवाय ते स्थायी समितीचे सदस्यही होते. या वर्षात त्यांनी प्राधिकरणाच्या कारभारात आणि कार्यात फार रस घेतला. त्यांचे अनेक बाबतीती मार्गदर्शन, विशेषतः आर्थिक, प्राधिकरणाला व प्राधिकरणाच्या समित्यांना विचारविनिमयाच्या वेळी फारच उपयुक्त ठरत असे. त्यांनी केलेल्या कार्याची प्राधिकरण गौरवपूर्ण नोंद घेत असून त्यांच्या दुःखद निधनाने झालेल्या हानीचीही नोंद घेण्यात येत आहे.

जोडपत्र *

--------

जोडपत्र 'ड'......

ठराव जोडपत्र -'ड'

महानगर आयुक्त श्री.पी.व्ही.नायक यांनी महानगर आयुक्त या नात्याने केलेल्या कार्याची नोंद प्राधिकरण गौरवपूर्ण शब्दात करु इच्छिते. श्री.नायक यांनी महानगर आयुक्त म्हणून अधिकारग्रहण केले तेव्हां प्राधिकरणाची भूमिका आणि कार्य या गोष्टी स्पष्ट झाल्या नव्हत्या. ते २ वर्षांहून कमी काळ अधिकारपदावर होते. या काळात श्री.नायक यांनी फार महत्वपूर्ण कार्य केले. विशेषतः त्यांनी प्राधिकरणाची भूमिका व कार्य स्पष्ट केले. व अनेक प्रकल्पांना मूर्त स्वरुप दिले. आतां हे प्रकल्प विचारविनिमयाच्या/कार्यवाहीच्या विविध अवस्थेत आहेत. बृहन्मुंबई बाहेरच्या क्षेत्रातील पाणीपुरवठा आणि मलप्रणाल योजना. ठाणे बाडी उल्हासनगर वसई बाडी भूजल प्रकल्प. वांद्रे-कुर्ला समूह आणि वांद्रे-कुर्ला समूहात घाऊक कापड बाजारपेठेचे स्थलांतर याविषयींच्या प्रकल्पांचा या ठिकाणी आवर्जून उल्लेख केला पाहिजे. महानगर प्रदेशाच्या एकूण विकासास प्रतिकूल अशा कांही घटनांवरील निर्बंधाबाबत १९७४ च्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियमाचे कलम ~~अब्बबे~~ १3 अन्वये प्राधिकरणाने हाती घेतलेल्या धोरणाच्या कार्यवाहीस श्री.नायक साधनभूत आहेत.

त्यांनी केलेल्या कार्याची गौरवपूर्ण शब्दात नोंद घेत असतांना त्यांना आपल्या नवीन अधिकारपदावर संपूर्ण यश लाभो अशी इच्छा प्राधिकरण व्यक्त करीत आहे.

--------

(315)

No. BMRDA/MTG/16.

BOMBAY METROPOLITAN REGION
DEVELOPMENT AUTHORITY,
18th floor, New Administrative
Building, Madame Cama Road,
Opp. Mantralaya, Bombay-400 032.

Date:- 17th October, 1978.

The Minutes of the 16th meeting of the Bombay Metropolitan Region Development Authority held on the 26th September, 1978, are enclosed.

2. A marathi translation will follow.

P. R. Walawalkar
~~Staff~~ Officer(II).

To:

All Members & Permanent invitees.

The Officers of the B.M.R.D.A.

adk/17/X/78

# MINUTES OF THE SIXTEENTH MEETING OF THE BMRDA

DATE : 26th September, 1978.

TIME : 10.30 A.M.

PLACE : The Corporation Hall of the Bombay Municipal Corporation.

A list of members and invitees present is attached. (Annexure 'A').

The Mayor welcomed the Chairman and the members of the Authority.

The meeting began with an address by the Chairman. A copy of the address is enclosed. (Annexure 'B').

A Resolution placing on record appreciation of services rendered by Shri V.K. Tembe and the deep sense of loss felt by the Authority at his sad demise was placed on record. (Annexure 'C').

Another Resolution appreciating the services rendered by Shri P.V. Nayak as Metropolitan Commissioner was adopted. (Annexure 'D'). The items on the Agenda were thereafter taken up for consideration.

Item No. 1 : Confirmation of the minutes of the last (Fifteenth) meeting held on the 31st March, 1978.

The minutes were confirmed.

Item No. 2 : Action taken on the minutes of the last (Fefteenth) meeting.

Action taken was noted.

With reference to item no. 2 of the statement of action regarding provision for development and expansion of existing gaothans in New Bombay and rehabilitation of local persons affected by the acquisition of land for the development of New Bombay, a copy of the reply given by the then Minister for Industry to a Resolution moved by Shri S.D. Baswant, MLC, in the Council on the 28th October, 1977 on

the same.....

the same subject, was placed on the Table as desired by Shri Baswant. Refering to the assurances given by the Minister in the Legislative Council, Shri Baswant pleaded for urgent action for development and expansion of gaothans in all villages, rehabilitation of local persons affected by the acquisition of land and relaxation of restrictions on land use in the area under acquisition. Some members as well as Shri Baswant demanded appointment of a Committee of members to study the question and recommend to the BMRDA and Government measures required to be taken to redress the grievances of the local persons affected by acquisition of land in New Bombay. The Secretary to the Government, Urban Development Department, explained that the proceedings for land acquisition would be expedited as soon as the question whether the land should be acquired under the Land Acquisition Act or under the Urban Land (Ceiling & Regulation) Act, 1976, is decided by the Government. He clarified that the Notifications issued under Section 4 of the Land Acquisition Act did not imply any restrictions on construction of "Farm Houses". The discussion was concluded with an assurance by the Chairman that he would himself visit the area along with some of the members of the Authority who are concerned/interested in the matter. He also agreed to convey to the State Government the urgency of taking appropriate action in the matter.

Item No. 3 : Modification of the Regional Plan - Govt. Notification No.RPB-1178/287-UD-5, dated March 15, 1978.

The Authority considered the Agenda Note. The members felt that they would require more time to study the proposal in all aspects. The Authority thereafter passed the following resolution :-

RESOLUTION 149 : Resolved that the State Government be requested to extend the last date for receiving objections and suggestions in respect of the proposed modifications to the Regional Plan published in the Government Notification No.RPB-1178/287-UD-5, dated the 15th March, 1973, till the 31st December, 1978 to

enable.....

319

enable the Authority to express its views on the proposal.

Item No. 4 : The modified planning proposals for the Bandra-Kurla Complex (Direct Action Area)

The Authority considered the Agenda Note. Some members expressed concern over the effect of reclamation on the flood absorption and environmental conditions resulting in increased mosquito nuisance in the area. The Metropolitan Commissioner explained that on the basis of the report of the hydraulic studies of the CWPRS, Khadakwasala, the project provided for the channelisation of the Mahim river and Vakola Nalla, which when completed would result in a very significant improvement of the environmental conditions in the area. He stated that a Co-ordination Committee consisting inter-alia of representatives of the Municipal Corporation has been set up to consider and carry out the programme of development including channelisation in a co-ordinated manner. The reclamation & channelisation would be so phased that at no stage during execution would the conditions be allowed to be affected adversely. He informed the Authority of the proposals made to the State Government to allow allotment of land already reclaimed with a view to raising the finances required to meet the cost of development, including channelisation in stages.

The Committee then passed the following resolution :-

RESOLUTION 150 : Resolved that further to Resolution No.118, dated the 9th June, 1977, the Metropolitan Authority, having considered the report of the Planning Committee presented under sub-Section (3) of Section 28 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 ("the Act", for brevity) and the objections and suggestions received by the Planning Committee, do in exercise of its powers under clause (d) of sub-section (3) of section 40 of the Act and all other powers enabling it in this behalf approve of the Planning Proposals for the development of lands situate in a portion of the Bandra-Kurla Notified Area specified in Government Notification, Urban Development and Public Health Department, No.BKR-1177/262-UD-5, dated

the 7th....

the 7th March, 1977 being modified as shown in Annexure IV to the Agenda Note and the Planning Proposals so modified being submitted to the State Government for approval.

Resolved further that the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to submit the foregoing modified Planning Proposals to the State Government for approval.

Resolved further that the action taken to publish the notice in Marathi in Navshakti instead of Loksatta in partial modification to Resolution No.118, dated the 9th June, 1977, be and is hereby confirmed and ratified.

Item No. 5 : Shifting of Wholesale Agricultural Produce and Iron & Steel Markets and Yard Activities to New Bombay.

The Authority considered the Agenda Note. The proposal was welcomed by the members. The following points were raised during the discussions:-

(1) There should be provision for more truck terminals.

(2) Utilisation of lands vacated by shifting of markets.

(3) The local consumers in South Bombay should not be allowed to be affected adversely by shifting of the wholesale markets.

The Metropolitan Commissioner replied to these points in detail and explained that as regards(1), though the Minister's speech refers only to the main general truck terminal for the city, this will be supplemented by a number of subsidiary truck terminals for each of these markets. Besides, the shifting of wholesale trading activity from south Bombay will relieve traffic burden on the Bombay Island very substantially.

As regards the alternative land use of the area vacated by the wholesale markets, the Commissioner drew attention to the report of the Study Group appointed under the Chairmanship of Shri B.N.Adarkar, to suggest alternative uses for areas to be vacated by shifting of markets from south Bombay, which was placed on the Table. The Metropolitan Commissioner explained ..

..... that

that it was necessary to have an element of legal sanction to support the efforts of the trading community to the shifting of wholesale markets. So far as the agricultural markets are concerned such powers were already available to Govt. under the A.P.M.C. Act, 1964, but a new legislation would be necessary for other commodities, which do not fall within the purview of the Agricultural Produce Market Act, 1964.

As regards (3), the office of the Authority had carried out studies which showed that the proposed shifting will not affect the retail and semi-wholesale trade in Bombay.

The Authority then passed the following Resolution:-

RESOLUTION 151 : Resolved that the proposals for shifting of wholesale Agricultural Produce Markets and wholesale Iron & Steel market and Yard activities from Bombay and development of agricultural produce market at Vashi-Turbhe and iron & steel market and yard at Kalamboli area near Panvel in New Bombay, as outlined in the Agenda Note, are generally approved and the Commissioner is authorised to take further necessary steps to achieve the stated objectives.

Item No. 6 : Relaxation of F.S.I. limit for Hotel Industry in Bombay.

The consideration of the Agenda Note was postponed.

Item No. 7 : Accounts of the Authority for the year 1977-78 and report of the Financial Adviser thereon.

The Authority considered the Agenda Note. Accounts for the year 1977-78 and report of the Financial Adviser were noted.

..... Item No.8 :

Item No. 8 : The B.M.R.D.A.(Disposal of Land) Regulations, 1977 - amendment of

The consideration of the item was postponed.

Item No. 9 : The B.M.R.D.A.(Conditions of Service) Regulations, 1977 - amendment of.

The Authority considered the Agenda Note and passed the following resolution:-

RESOLUTION 152 : Resolved that the draft B.M.R.D.A. (Conditions of Service) (Second Amendment) Regulations, 1978 as shown in the Annexure 'E' are approved.

Item No. 10 : Development of out-lying areas of B.M.R. and B.M.R.D.A.'s Fund Structure.

The Authority considered the Agenda Note. It was agreed that a note on the assistance provided for the areas of B.M.R. outside Greater Bombay since the inception of the B.M.R.D.A. will be placed before the Authority in its next meeting. The Authority then passed the following resolution:-

RESOLUTION 153 : Resolved that the Authority endorses the recommendation made by the Standing Committee and request the State Government :

(i) to make an annual contribution of not less then Rs. 5.00 crores to the B.M.R.D.A. under Section 18(1)(a) of the B.M.R.D.A. Act;

(ii) to allow the B.M.R.D.A. to recoup its regular deficit relating to planning, coordination, monitoring and surveys and studies, from the contributions to be received under Section 18(1)(a); and

(iii) to make an appropriate one-time capital grant for making essential fixed capital expenditure by the Authority.

Item No. 11 : Letter of Mayor of Bombay, regarding the issues raised in a letter to Editor, Indian Express (Dt.15.6.1978) under the heading "Save Bombay".

Noted.

Item No. 12 : Letter of Mayor of Bombay, regarding the issues contained in the article in Maharashtra Times(Dt.21.6.78) by Dr. P.J.Deoras about Bandra-Kurla Complex & Shifting of Cloth Markets.

Noted.

------

List of the Members present at the Sixteenth Meeting of the Authority held on the 26th September, 1978.

| | |
|---|---|
| Shri Hashu Advani, Minister for Urban Development. | Chairman |
| Shri Bhaurao Mulak, Minister of State for Urban Development. | Vice-Chairman. |
| Shri Wamanrao Mahadik, Mayor of Bombay. | -"- |
| Shri L.S. Lulla, Chief Secretary to the Govt.of Maharashtra. | Member |
| Shri B.K. Chougule, Municipal Commissioner, BMC. | -"- |
| Shri B.N. Adarkar, Chairman, T.& C. Board, BMRDA. | -"- |
| Shri Hansraj Bhugra, Councillor, BMC. | -"- |
| Shri S.D. Baswant, MLC | -"- |
| Shri C.R. D'Cruz, Chairman, BEST Committee, BMC. | -"- |
| Shri M.S. Deora, Councillor, BMC | -"- |
| Shri Sudhir Joshi, Councillor, BMC | -"- |
| Shri M.A. Khandwani, Councillor, BMC. | -"- |
| Shri D.K. Khanvilkar, President, Alibag Municipal Council. | -"- |
| Shri P.K. Kurne, MLA. | -"- |
| Shri G.M. Koli, MLA. | -"- |

(P.T.O.)

| | |
|---|---|
| Shri M.M. Kini,<br>General Manager,<br>Bombay Telephones. | Member |
| Shri Pushpakant Mhatre,<br>Councillor, BMC | -"- |
| Shri N.G.K. Murti,<br>Chairman, W.M Board, BMRDA. | -"- |
| Shri A.W. Patil,<br>Councillor, BMC. | -"- |
| Shri S.W. Patwari,<br>President, Dombiwali<br>Municipal Council. | -"- |
| Dr. M.G. Parulekar,<br>President, Vasai<br>Municipal Council. | -"- |
| Shri V.K. Patil,<br>Chairman, Panchayat<br>Samiti, Bhiwandi. | -"- |
| Shri B.H. Shete,<br>Chairman, STanding<br>Committee, PMC. | ="- |
| Shri D.B. Sule, MLC. | -"- |
| Smt. Tarabai Vartak,<br>President, Z.P., Thane. | -"- |
| Shri B.D. Zute,<br>Chairman, Improvement<br>Committee, PMC. | -"- |
| Shri Madhav S. Palnitkar,<br>Metropolitan Commissioner,<br>BMRDA. | Member-Secretary. |

INVITEES

Shri G.H. Lalwani,
Secretary to Govt. of Maharashtra,
Urban Development Department.

Shri B.S. Dhavle,
Managing Director,
CIDCO.

---

tms/27.9.78

Annexure-B'

(325)

Speech of Chairman

I have great pleasure in welcoming you to this 16th meeting of the Authority and the first meeting since the new Government took over. Several changes have taken place in the composition of the Authority, and I take this opportunity to welcome the following new members of the Authority :-

| Sr. No. | Members | |
|---|---|---|
| 1. | Shri Bhaurao Mulak, | Vice-Chairman. |
| 2. | Shri Uttamrao Patil, Minister for Revenue & Rehabilitation. | Member. |
| 3. | Shri S.B.Chavan Minister for Finance Planning & Energy. | Member |
| 4. | Shri Sunderrao Solanke, Minister for Industries, Dairy Development, Fisheries & Animal Husbandry. | Member |
| 5. | Shri B.S.Surve, Minister for Housing | Member |
| 6. | Shri Sadanand Varde, Minister for Education | Member |
| 7. | Shri B.L.Patil, Minister of State for Animal Husbandry and Dairy Development. | Member |
| 8. | Shri C.R.D'cruz, Chairman, BEST. | Member |
| 9. | Shri C.C.Bhujbal Councillor, BMC. | Member |
| 10. | Shri Amarnath Waman Patil- Councillor, BMC. | Member |
| 11. | Shri Pralhad Kurne, MLA. | Member. |
| 12. | Shri G.M.Koli, MLA. | Member |

13....

13. Shri L.S.Lulla Member
Chief Secretary.

14. Shri M.R.V.Murti Member
General Manager,
Central Railway.

15. Shri B.K.Chougule Member
Municipal Commissioner.

I also take this opportunity to express our gratitude for services rendered to the following persons who have ceased to be members of the Authority.

1) Shri Vasantdada Patil, Chairman
Chief Minister.

2) Shri R.V.Tripathi Vice-Chairman.
Minister of State for Urban Development.

3) Shri Y.J.Mohite
Minister for Finance.

4) Shri S.G.Pawar,
Minister for Industries.

5) Shri S.R.Naik,
Minister for Housing.

6) Shri P.S.Pai,
Chairman, BEST Committee.

7) Shri Sohan Singh Kohli,
Councillor, BMC.

8) Shri S.V.Bhave,
Chief Secretary,

9) Shri P.R.Pusalkar,
General Manager,
Central Railway.

10) Shri B.G.Deshmukh,
Municipal Commissioner, BMC.

I would like to draw your particular attention to the sad demise of Shri V.K.Tembe, who was a very active and valued member of this Authority. He lived and worked in the true spirit of public service. We in this Authority along with the citizens of Bombay deeply mourn his premature

passing....

327

passing away.

In the month of June this year, Shri P.V.Nayak, the Metropolitan Commissioner was transferred, and replaced by Shri Madhav S. Palnitkar. I would like to place on record our appreciation of the services of the ex-Metropolitan Commissioner, Shri P.V. Nayak, who conducted the affairs of the Authority during the initial period so ably.

Coming to the main work before the Authority the last meeting of the Authority was held in March, 1978. Ordinarily, there should have been another meeting in July, but for reasons which are well known, no meeting could be held in July or August.

Since its inception in 1975, for the purpose of a well coordinated development of Greater Bombay and its environs, this Organisation has been conducting a large number of studies in depth which have resulted in the identification of basic problems of this great metropolitan area and alternative approaches to the solution of these problems have to a substantial degree been scientifically worked out. In the absence of such a basic work no physical work is possible for the development of an area covering 4000 sq.m. with a population of more than 9.5 million. The problem was and is all the more difficult, because of its complex economic and geographic reasons and the fact that this area serves as a hub for the economic activities of the whole country. Obviously during this period nothing substantial could be physically noticiable by the citizens of this area. The work which has been gone into the foundation over last 3 years, has now reached a critical stage. We are now in a position to launch major and massive schemes which will not only immediately ameliorate living conditions in this area but will go a long way in starting the trend for a well ordered and properly

thought....

thought out development of the entire Region, and thereby help us achieve two major goals viz., continued improvement in the quality of life and continued addition of strength to the whole Region to act as a leader in further economic development of the Country.

As you are already aware, apart from the basic planning process, certain schemes with the help of the World Bank for improvement of water supply and road and transport network in the BMC area are already under execution. Apart from these, there are a number of existing schemes and plans which are about to be launched by us during the Sixth Plan period to which I will refer a little later. I would like to take this opportunity to place a short list of these schemes before you for your information.

(1) The first is the immediate development of Bandra-Kurla area to act as a subsidiary commercial centre to relieve the pressure in South and Central Bombay;

(2) Various schemes including water supply, area development and improvement of local infrastructure in the Kalyan Complex which covers six Municipalities from Thane to Ambernath and more than 100 villages in and around it. A water supply scheme which would cost approx.Rs.80 crores and is already in an advanced stage of negotiations with the World Bank and the other cognate schemes which will become operational during the course of next 12 to 18 months - each of these detailed scheme will be presented by the organisation to you in due course and your valued advice would be of great help in their furtherence;

(3) The truck terminal at Wadala - a scheme which is under discussion with the World Bank and the inland water transport project spreading over the Thane Creek and the Bombay Harbour, are two major schemes which will improve the transport and communications facilities in this area;

(4) Apart from....

(4) Apart from scheme for expediting the transfer of jobs to New Bombay including the CBD at Belapur, I am sure you will join with me when I say that every citizen not only of this area but every well thinking citizen of the country strongly feels that the healthy and prosperous development of this Region, which has a nexus with the economic growth of the Country, requires urgent action for the construction of ancillary harbour facilities at Nava-Sheva. You must be conversant that our urging has resulted in the Planning Commission setting up a High Level Committee for immediate consideration of this matter under the Chairmanship of Dr. Ajit Muzumdar. Your organisation is not only doing everything possible for securing the starting of this project but is also preparing subsidiary plans and schemes to take advantage of the gains which might occur as a result of the coming of the Nava-Sheva harbour into reality;

(5) I need hardly mention the massive Bombay Urban Transport, project which is under execution with the financial assistance of the order of £25 million from the World Bank.

(6.) Your orga-nisation has focussed the attention of the Railway Board for improving the railway network in this Region, especially on immediately taking up of the Diva-Belapur line and the Chembur-Panvel line across the creek and optimisation of the traffic on the Central Railway. We are receiving a very favourable response from the Railways.

2. Even this brief description of the projected activities for the next two-three years will make it clear to you that most of these activities are what could be called multi-agency activities, and therefore, the BMRDA in performance of its role as a catalytic agent and co-ordinator, must prepare a well understood, practicable and feasible plan profile to dovetail all these activities. Substantial work in this direction has been completed in recent months, and the first outline profile of the Sixth Plan period which envisages an investment of the order of Rs.1,900 crores through all the agencies (including the private sector in some respects), is being prepared for being presented to the State Government's Planning authorities in due course. During the next few months, this Plan will be presented

through......

through the state Government to the national planning authorities, and I am confident with a few marginal changes, this frame will receive the seal of national approval and will then form a basic guideline for public and private investment during the Sixth Plan period in this region. I must hasten that this problem is now only at its outline stage and is being given a proper shape by the experts concerned. I will have the pleasure of presenting to you in a proper shape the draft plan for your consideration and advice in the near future.

3. Maharashtra is one of the most urbanised States in the country with more than one-third of its population in the urban areas; and the Bombay Metropolitan Region is the main surce of this urbanisation and therefore, the problems of this Region are both complex as well as of serious economic and demographic dimensions, but I am sure, that the mature experience of the members of this Authority, the task is not beyond our capability.

I would now like to turn to the agenda.

tms/25.9.78

ANNEXURE - C

## RESOLUTION

Shri V.K. Tembe, a former Member of the Authority, passed away on the 30th August, 1978. Shri Tembe had been a member of the Authority since the beginning. He was also a member of its Standing Committee. During this period, Shri Tembe evinced a keen interest in the affairs and work of the Authority. His guidance on several matters, particularly those relating to finance, had been of immense help to the Authority and its Committees in their deliberations. The Authority wishes to place on record its appreciation of the services rendered by Shri Tembe and also its deep sense of loss as a result of his sad demise.

Vp:171078.

ANNEXURE - D

RESOLUTION

The Authority wishes to place on record its appreciation of the services rendered by Shri P.V. Nayak, as the Metropolitan Commissioner. Shri Nayak assumed the office of the Metropolitan Commissioner at a time when the role and functions of the Authority had not yet been clarified. During his term of less than 2 years, Shri Nayak made very significant contributions, particularly in defining the role and functions of the Authority and giving shape to several projects, which are new at various stages of consideration/implementation. Particular mention needs to be made of the proposals for water supply and sewerage schemes in the areas outside Greater Bombay, Thana Creek Ulhas River-Bassein Creek Inland Waterway Project, development of Bandra-Kurla Complex and the proposal to shift wholesale textile market to the Bandra-Kurla area. Shri Nayak was also instrumental in implementing the policy enunciated by the Authority under Section 13 of the BMRDA Act, 1974, in regard to restrictions on certain developments adverse to the overall development of the Metropolitan Region.

While placing on record its deep appreciation of his services, the Authority wishes him every success in his new assignment.

1078.

(353)

ANNEXURE - E

THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY(CONDITIONS OF SERVICES) (2ND AMENDMENT) REGULATIONS, 1978.

In exercise of the powers conferred by sub-Section (2) of Section 11 and Clause (b) of Sub-Section (2) of Section 6, read with Section 50 of the Bombay Metropolitan Region Development Authority, 1974, the Bombay Metropolitan Region Development Authority hereby makes the following Regulations, namely :-

1. (i) These Regulations may be called the Bombay Metropolitan Region Development Authority (Conditions of Service) (Second Amendment) Regulations, 1978.

(ii) They shall come into force at once.

2. After Regulation 5 of the BMRDA (Conditions of Service) Regulations, 1977, the following Regulation shall be inserted, viz. :

"6. Wherever the Rules and Orders applicable to the servants of the Government of Maharashtra referred to in Regulation 3 shall state or declare that a certain act, thing or deed shall be done or not done with the consent, assent, sanction or approval of the authority or person specified therein, such authority or person shall, for the purposes of these Regulations, be the Metropolitan Commissioner or any officer of the Authority designated by him from time to time by a general or special order."

Vp:17.10.78.